International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.466
Volume 4, Issue 2, April-June 2024 ID: IJCRTA0000119 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# बुलढाणा जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर यांचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा तौलनिक अभ्यास

**धनंजय प्रकाश अडेलकर* ; डॉ. प्रवीण ज्ञा. कनकुटे****

**लेखक संलग्नता:**
*संशोधक विद्यार्थी, समाजकार्य महाविद्यालय, जालना, महाराष्ट्र. भारत.
Email: dhananjay.adelkar999@gmail.com
**सहाय्यक प्राध्यापक, समाजकार्य महाविद्यालय, जालना, महाराष्ट्र. भारत.
Email: kankutepravin@gmail.com

**लेख संदर्भ:** अडेलकर, धनंजय प्रकाश., & कनकुटे, प्रवीण ज्ञा. (2024). बुलढाणा जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर यांचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा तौलनिक अभ्यास. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 4(2), pg.18-22. ijcrta.org

## प्रास्ताविक :

भारत हा कृषीप्रधान देश असून आजही भारतातील एकूण लोकसंख्येपौकी 57% लोकसंख्या ही कृषी व्यवसायावर अवलंबून आहे. कृषी हे भारतीय अर्थव्यवस्थेचे एक अविभाज्य अंग आहे. सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून भारतातील कृषीचे स्थान महत्वाचे म्हणजे अग्रगण्य आहे. तसेच बुलढाणा जिल्हा हा कृषीप्रधान जिल्हा असून बुलढाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात शेतीचे महत्वाचे योगदान आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील बहुसंख्य लोकांच्या उपजिवीकेचे साधन शेती हेच आहे. म्हणून शेती व्यवसायाला बुलढाणा जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेत अनन्यसाधारण महत्व आहे. शेती व्यवसायाशी संबंधित असलेले शेतमजूर यांची संख्या जिल्ह्यात भरपूर आहे व दिवसेंदिवस या संख्येत वाढ होत आहे. शेती क्षेत्र शेतमजूरांना सामावून घेण्यात अपूर्ण पडत असल्याने त्याचे दुरगामी परिणाम शेतमजूरांच्या आर्थिक स्थितीवर निश्चितच होतात. तसेच जिल्ह्यातील सिमांत शेतकरी हा हंगामाच्या कालखंडात स्वतःच्या शेतीत राबतो. मात्र कुटुंबाच्या उदरनिर्वाहाला पुरेसे होईल एवढे उत्पादन जमिनीच्या या लहानश्या तुकडयातून न मिळाल्यामुळे त्यांना हंगामाच्या कालखंड वगळता उर्वरीत कालखंड इतरांच्या शेतीवर शेतमजूर म्हणून काम करावे लागते. म्हणून सिमांत शेतकरी सुद्धा शेमजूरांमध्ये मोडला जातो. तसेच काही शेतमजूर अल्प भूधारक आहेत की, ज्यांच्या जवळील शेतात एका बौलजोडीला पुरेल एवढेही काम नसते. म्हणून यांना सुद्धा उदरनिर्वाह करीता मजूरी या व्यवसायावरच अवलंबून राहावे लागते.

काही शेतमजूर भूमिहीन आहेत. ज्यांचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन शेतमजूरी आहे. या तिन्ही गटातील शेतमजूरांची उत्पन्न स्थिती वेगवेगळी दिसते. गेल्या 10-12 वर्षाच्या कालखंडातील अर्थव्यवस्थेत

International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.466
Volume 4, Issue 2, April-June 2024 ID: IJCRTA0000119 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

झालेले बदल तसेच कृषी तंत्रज्ञानात झालेल्या बदलाचे बरे-वाईट परिणाम शेतकरी व शेतमजूरांच्या आर्थिक स्थितीवर झाले आहे. शेतीच्या उत्पादन क्षमतेत वाढ झालेली दिसत आहे. बुलढाणा जिल्ह्याचा शेती क्षेत्रात जो विकासात्मक बदल झाला आहे या बदलाचा बुलढाणा जिल्ह्यातील सिमांत शेतकरी, शेतमजूर व भूमिहीन शेतमजूर यांच्या आर्थिक स्थितीवर निश्चित फार मोठा परिणाम झालेला आहे.

**शेती व भुमिहीन शेतमजुरः**

भारतीय शेतीचे अजूनही पूर्णपणे यांत्रिकीकरण झालेले नाही. पिक लागवड, मशागत, व उत्पादनांमध्ये शेतमजुरांचा सहभाग महत्त्वाचा मानला जातो. शेतमजुराशिवाय शेती करण्याचा विचारच करता येत नाही. ग्रामीण लोकसंख्येत शेतमजुरांचे प्रमाण मोठे असते व त्यांची संख्या वेगाने वाढत गेलेली आढळते. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या ते मागासलेले असतात, त्यांचे शोषण होत असते व देशातील तो एक दुर्लक्षित गट म्हणून ओळखला जातो. फार कमी शेतमजुरांना स्वतःची थोडीफार जमीन दिसून येते पण शेती परवडत नसल्याने वर्षातील बहुतेक काळ दुसऱ्याच्या शेतावर ते मजुरी करतात. यांची वैशिष्ट्ये म्हणजे अत्यल्प, बेभरवशाचे तसेच चढउताराचे उत्पन्न, समाजातील खालच्या स्तरावरील जीवन, सातत्याने होणारी पिळवणूक, मागासलेले राहणीमान, सार्वत्रिक बेरोजगारी, कर्जबाजारीपणा इत्यादी होय. त्यांच्यापैकी मोठे प्रमाण समाजातील मागास जाती, जमाती, आदिवासी अशा उपेक्षित वर्गांचे असते.

देशातील दारिद्र्यरेषेच्या खाली असणाऱ्या लोकसंख्येत शेतमजुरांचेच प्रमाण मोठे असते. आर्थिक परिस्थिती बेताची व घरखर्च, लग्नकार्य, मुलांचे शिक्षण अशा विविध कारणांमुळे यातले बहुसंख्य शेतमजुर हे कर्जबाजारी झाल्याचे दिसून येतात. सन १९९१ च्या राष्ट्रीय ग्रामीण मजूर आयोगानुसार त्यावेळच्या एकूण ग्रामीण मजुरांपैकी सुमारे ४० टक्के शेतमजूर होते. त्यातही भूमिहीन, अल्पभूधारक आणि सीमान्त शेती असणारे बहुसंख्य मजूर होते. शेतमजुरांच्या संख्येत वेगाने वाढ होत आहे, असेही महत्त्वाचे निरीक्षण आयोगाने नोंदविले होते. बेकारी, विपन्नावस्था, गरिबी, नैराश्य अशा गोष्टी मजुरांच्या बाबतीत सातत्याने आढळतात. मजुरांच्या संख्येत दरवर्षी लाखांची भर पडत असताना त्यांना मिळणाऱ्या रोजगाराचे प्रमाणही कमी होत आहे, असे आयोगास आढळले.

**भुमिहीन शेतमजुरांची सामाजिक व आर्थिक स्थितीः**

भुमिहीन शेतमजुरांना नेहमीच मोठ्या प्रमाणात सामाजिक व आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. भुमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती सुधारण्याचे जे थोडेफार प्रयत्न भारतात स्वातंत्र्यानंतर झाले त्याचा अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. शेतमजुरांच्या वेतनात प्रदेशपरत्वे मोठी विषमता आढळून येते. बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा या राज्यांमध्ये वेतन कमी व बहुतांशी वस्तुरूपात असे. गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यांतील मजुरांना सापेक्षतेने अधिक मजुरी मिळत असे तथापि स्वातंत्र्यानंतरच्या प्रयत्नांमुळे मजुरीदरातील प्रादेशिक तफावत बरीच कमी झाली आहे व मजुरांना रोख स्वरूपात वेतन मिळण्याचे प्रमाणही वाढले आहे. दुसरे म्हणजे, स्त्री व पुरूष यांच्या वेतनांतही मोठी तफावत असे, तीही कमी झाल्याचे दिसून येते.

हरितक्रांतीच्या काळातील बदल भांडवलप्रधान होते. शेतीच्या यांत्रिकीकरणावर त्यांचा भर होता, श्रमाची बचत करणारी उत्पादनपद्धती देशातील विकासनीतीचा एक अविभाज्यभाग बनली. यामुळे बेकार व अतिरिक्त व्यक्तींचा भार शेतमजुरांच्या रूपाने शेतीक्षेत्रावर पडला. शेतीक्षेत्रास वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था फारशा उपलब्ध नसल्याने व्यापारी - जमीनदारांकडून जबर व्याजाने कर्ज घेणे व त्याची परतफेड न झाल्यास जमिनीचा तुकडा विकून शेतावर मजुरी पत्करणे, अशा गोष्टी सार्वत्रिकपणे दिसून आलेल्या आहेत.

भुमिहिन शेतमजुरांमधील निरक्षरतेचे मोठे प्रमाण व त्यांच्यातील कला-कौशल्य-कार्यक्षम यांचा अभाव हे त्यांच्या हलाखीच्या परिस्थितीमागील मुख्य कारण होय. शेतमजूर बहुतांशी असंघटित असल्याने त्यांच्याकडे मोठी सौदाशक्तीही नसते. औदयोगिक कामगार संघटित होऊन कामगार संघटनांमार्फत वेतनवाढ आणि इतर सुखसोयी पदरात पाडून घेऊ शकतात. शेतमजुरांची परिस्थिती अशी नसते. शेतीमध्ये काम हंगामी स्वरूपाचे असते, हे त्यांच्या अवघड परिस्थितीमागील आणखी एक महत्त्वाचे कारण होय. ग्रामीण भागात इतर पर्यायी बिगरशेती रोजगार अभावानेच असल्याने सक्तीची बेरोजगारी स्वीकारणे त्यांना भाग पडते. अशा सर्व घटकांमुळे शेतमजुरांची आर्थिक स्थिती जेमतेम निर्वाहक्षम पातळीपर्यंत असते.

**संशोधन निवडीचे महत्व :**

भुमिहीन शेतमजुर हा भारतीय शेतीचा अविभाज्य घटक आहे. शेती क्षेत्राच्या विकासासाठी अनेक योजना तयार करण्यात आल्या, अनेक महत्वपूर्ण शिफारशी केल्या. या शिफारशींना केंद्र सरकार, राज्य सरकार व रिझव्र्ह बँकेने वेळोवेळी स्विकारल्या. असे असले तरी शेती क्षेत्राच्या विकासाबाबत नवीन संरचना कशी असावी या संदर्भात स्पष्ट दृष्टी आढळत नाही. त्यातच बुलढाणा जिल्ह्यातील रहिवासी असल्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील कृषी क्षेत्राच्या विकासातील सहकारी वित्त पुरवठयाबाबत वेगवेगळ्या अंगांचा सखोल अभ्यास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न नियोजित संशोधन कार्यात केला.

बुलढाणा जिल्ह्यात ग्रामीण आणि कृषी विकासात सहकारी वित्त पुरवठा करणा·या सहकारी संस्था, बँका यांचे योगदान अधिक असल्याने त्यांची कार्यपद्धती सुधारण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल. कृषी सहकारी पतसंस्था तसेच सहकारी बँकांची कर्जनिती अधिक विकासाभिमुख करण्यासाठी सदर संशोधन उपयुक्त ठरेल. तसेच महाराष्ट्रातील व पर्यायाने देशातील कृषी वित्त पुरवठा धोरण निश्चित करताना सदर संशोधन उपयुक्त ठरेल. एवढेच नव्हे तर या क्षेत्रातील संशोधन करतांना देखील ते उपयुक्त ठरेल अशी खात्री आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये:**

नियोजित संशोधनाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत-

1) बुलढाणा जिल्ह्यातील शेतमजूरांच्या आर्थिक स्थितीतील बदलांचा तौलनिक अभ्यास करणे.
2) विविध सहकारी योजनांचा भूमिहीन शेतमजूर यांना मिळणा·या लाभंचा अभ्यास करणे.
3) शेतमजूरांच्या समस्यांचा तौलनिक अभ्यास करणे.
4) शेतकरी व शेतमजूरांच्या समस्या दूर करण्यासाठी उपाय सुचविणे.

5) शेतकरी व शेतमजूरांना विविध योजनांचा योग्य वापर करण्यासाठी शिफारशी सुचविणे.

**संशोधनाची गृहीतकृत्ये :**

नियोजित संशोधनाची जी गृहीतकृत्ये स्विकारण्यात आली आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत.

1) बुलढाणा जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे महत्वाचे स्थान आहे. जिल्ह्यात औद्योगिक व इतर क्षेत्रांचा तुलनात्मक विकास फारसा झालेला नसल्यामुळे लोकसंख्येचा भार शेती क्षेत्रावर मोठया प्रमाणावर पडत आहे. परिणामी त्याचे मुख्यत: शेतमजूरांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होत आहे.
2) अलिकडील आर्थिक सुधारणा व कषीतंत्रज्ञानातील बदलांचा शेतकरी व शेतमजूरांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम झाला आहे.
3) कृषी पतपुरवठयाच्या माध्यमातून ग्रामीण भागात लोकशाहीचे तत्व जोपासले जाऊन सामाजिक नितीमूल्यांचा विकास होऊन राष्ट्रीय एकात्मकतेत वाढ होते.
4) कृषी सहकार पतसंस्था या शेतीव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी फारसे कर्ज देत नाहीत.
5) सहकारी बँका/कृषी सहकारी पतसंस्थांमुळे कृषी उत्पादनात वाढ होत आहे.
6) कृषी सहकारी पतपुरवठयांमुळे ग्रामीण भागात सावकारी कर्जाचे प्रमाणा कमी होवून शेतक·यांची आर्थिक पिळवणूक कमी झालेली नाही.

**संदर्भ सुची :**

1) श्रमाचे अर्थशास्त्र - डॉ. प्रभाकर देशमुख, विद्या प्रकाशन, नागपूर
2) भारतातील शेतीचे अर्थशास्त्र - डॉ. प्रभाकर देशमुख, विद्या प्रकाशन, नागपूर
3) वेतन सिद्धांत - डॉ.ज.का. पाटील, फडके प्रकाशन, कोल्हापूर
4) भारतातील सहकारी - प्रा. वि.ब. कुकडे, समाज प्रबोधन संस्था, पुणे
5) कृषी अर्थशास्त्र - प्रा.डॉ. स.श्री.मु. देसाई, निराली प्रकाशन, पुणे
6) कामगार संघटना - बंगाराम तुळपुळे, लोखंडे प्रकाशन, पुणे
7) भारतीय अर्थव्यवस्था - प्रा. के.एम. भोसले, फडके प्रकाशन, कोल्हापूर
8) भारतीय अर्थव्यवस्था - डॉ. देशमुख प्रभाकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर
9) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - प्रा. साळुंखे, प्रा. पेडगावकर
10) शेतीचे अर्थशास्त्र - डॉ. गंगाधर कायदे पाटील

**मासिके, त्रौमासिके, वर्तमान पत्र :**

1) Economic and Political Weekly
2) लोकराज्य
3) शेतकरी
4) योजना

5) अर्थसंवाद
6) अन्नदाता
7) ॲग्रोवन (सकाळ)
8) बळीराजा
9) अर्थबोध पत्रिका
10) समाज प्रबोधन पत्रिका
11) शरद कृषी